# ‘नियमीत प्रसिध्दी पत्रक’
# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद.

मंगळवार, दि.१५/०९/२०२०
वेळ: १९.००

## “मोटार वाहन कायदा अंतर्गत २१७ कारवाया- ४५,९०० ₹ ‘तडजोड शुल्क प्राप्त.”

उस्मानाबाद जिल्ह्यातील महत्वाच्या रस्त्यांवर दि. १४.०९.२०२० रोजी १८ पोलीस ठाणी व उस्मानाबाद शहर वाहतुक शाखा यांनी मोटार वाहन कायदा अंतर्गत २१७ कारवाया करुन ४५,९०० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल केले आहे.

## “मनाई आदेशांचे उल्लंघन: १७ व्यक्तींना प्रत्येकी २००/-रु. दंड.”

**पोलीस ठाणे, उमरगा:** कोविड- १९ संबंधीच्या मनाई आदेशांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुध्द पो.ठा. उमरगा यांनी दि. १४.०९.२०२० रोजी सार्वजनिक ठिकाणी थुंकणाऱ्या १७ व्यक्तींकडुन प्रत्येकी २००/-रु. प्रमाणे असा एकुण ३,४००/-रु. दंड वसुल केला आहे.

## “अवैध मद्य विरोधी कारवाई”

**पोलीस ठाणे, भुम:** विमल गवळी, रा. समर्थनगर, भुम या दि. १५.०९.२०२० रोजी शहरातील राहत्या गल्लीत १८० मि. ली. देशी दारुच्या ९ बाटल्या (कि.अं. ६३०/-रु.) विनापरवाना बाळगल्या असतांना पो.ठा. भुम यांच्या पथकास आढळल्या.

**स्थानिक गुन्हे शाखा:** लक्ष्मी माणिक जाधव, रा. वत्सलानगर, चिवरी पाटी अणदूर, ता. तुळजापूर या दि. १४.०९.२०२० रोजी स्वत:च्या राहत्या घरासमोर ३२ लि. गावठी दारु (किं.अं. २,४६०/-रु.) अवैधपणे बाळगल्या असतांना स्था.गु.शा. च्या पथकास आढळल्या.

यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद आरोपींविरुध्द भुम व नळदुर्ग पो.ठा. येथे म.दा.का. अंतर्गत गुन्हे नोंदवले आहेत.



(नळदुर्ग येथील अवैध मद्य विरोधी छाप्याचे छायाचित्र.)

## “सार्वजनिक ठिकाणी गोंधळ करणाऱ्या मद्यपीवर गुन्हा दाखल.”

**पोलीस ठाणे, आनंदनगर:** किशोर दत्तात्रय रेणुके, वय २९ वर्षे, रा. साईकमल हॉटेल मागे, उस्मानाबाद हा दि. १३.०९.२०२० रोजी २२.४५ वा. सु. मद्यधुंद अवस्थेत पोलीस ठाणे आनंदनगर च्या आवारात मोठमोठ्याने आरडा ओरड करुन शिवीगाळ करत होता. यावर पो.ठा. आनंदनगर चे पोना- गोविंद खोकले यांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन म.दा.का. कलम- ८५ (१) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “फसवणुक.”

**पोलीस ठाणे, आनंदनगर:** १) हेमंत रागढे, रा. कळंब २) जाहेद ३) कव्हाळे, दोघे रा. जि. चंद्रपुर ४) गौस, रा. औसा जि. लातूर या चौघांनी शरद भुजंगराव जाधवर, रा. ताडगांव, ता. कळंब यांना महिंद्रा एक्स युव्ही ५०० वाहन क्र. एम.एच. ३४ ए ४९९२ हे दि. १७.०४.२०२० रोजी विक्री केले.
या व्हहारादरम्यान वरील चौघांनी नमूद वाहनाचा अपघात झाल्याची हकीकत लपवली. तसेच वाहनाच्या स्पीडोमीटर मध्ये छेडछाड करुन वाहनाचा वापर कमी झाला असल्याचे दर्शवले. अशा प्रकारे नमूद चौघांनी शदर जाधवर यांना वाहन विक्रीत जाणीवपूर्वक खोटी माहिती देउन त्यांची आर्थिक फसवणुक केली. अशा मजकुराच्या शदर जाधवर यांनी दि. १४.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ४२०, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## “चोरी.”

**पोलीस ठाणे, तामलवाडी:** चिंतामण नारायण यादव, रा. माऊली नगर, कळंब यांच्या राहत्या घराचे बांधकाम अपूर्ण असल्याने घरास दरवाजे, खिडक्या बसवलेल्या नाहीत. याचा फायदा घेउन अज्ञात चोरट्याने दि. ०८.०९.२०२० रोजी मध्यरात्री घरातील ओनीडा कंपनीचा टीव्ही, सॅमसंग मोबाईल फोन व भिंतीवरील घड्याळ असा एकुण ११,२००/-रु. किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या चिंतामण यादव यांनी दि. १४.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, उमरगा:** उमरगा तालुक्यातील मुळज गावात उभारल्या जात असणाऱ्या सौर उर्जा संयंत्र उभारले जात असुन कंत्राटदाराने त्याचे साहित्य तेथे उघड्यावर ठेवले आहे. या साहित्यातील एक खोके उघडून त्यातील प्रत्येकी ८,०००/-रु. किंमत असलेल्या १२ सौर उर्जा पाट्या अज्ञाताने चोरुन नेल्या असल्याचे दि. १०.०९.२०२० रोजी १४.३० वा. कंत्राटदार प्रतिनीधी- श्री. शुभेंद्र श्रीवास्तव, रा. बिहार राज्य यांच्या निदर्शनास आले. यावरुन नमूद कंत्राटदार प्रतिनीधी यांनी दि. १५.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, येरमाळा:** नसीर वजीर पठाण, रा. तेरखेडा, ता. वाशी यांनी आपली हिरो होंडा मो.सा. क्र. एम.एच. २५ एआर २३३० ही दि. १०.०९.२०२० रोजी राहत्या घरा समोर लावलेली होती. ती पहाटे ०५.०० वा. सु. अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या नसीर पठाण यांनी दि. १५.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३७९ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** सोमनाथ प्रकाश कोरे, रा. व्होनाळा, ता. तुळजापूर यांनी दि. १०.०९.२०२० रोजी गावातीलच आपल्या चुलत भावाच्या घरासमोर लावलेली हिरो होंडा स्प्लेंडर मो.सा. एम.एच. १३ एयु २३४६ ही मध्यरात्री अज्ञात चोरट्याने चोरुन नेली. अशा मजकुराच्या सोमनाथ कोरे यांनी दि. १५.०९.०२०२० दिलेल्या प्रथम खबरेवरुन गुन्हा नोंदवला आहे.

**“मारहाण.”**

**पोलीस ठाणे, परंडा:** १) विशाल जाधव २) अजय जाधव, दोघे रा. परंडा ३)गणेश सुभाष जाधव, रा. मिरजगांव, ता. कर्जत या तीघांनी पुर्वीच्या भांडणाच्या कारणावरुन दि. १४.०९.२०२० रोजी १३.३० वा. सु. परंडा येथील नातेवाईक- धनेश हरी जाधव यांना बावची चौक, परंडा येथे शिवीगाळ करुन कोयता, काठीने मारहाण करुन जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. यात धनेश यांनी कोयत्याचा वार हातावर झेलल्याने दोन्ही हातांस गंभीर जखम झाली. अशा मजकुराच्या धनेश जाधव यांनी दि. १४.०९.२०२० रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भा.दं.सं. कलम- ३२६, ३२३, ५०४, ५०६, ३४ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

**पोलीस ठाणे, नळदुर्ग:** कोंडीबा श्रीपती देवकर, वय ८० वर्षे, रा. कार्ला, ता. तुळजापूर हे पत्नी- सुशीला व नातेवाईक- मालनबाई यांसह दि. १३.०९.२०२० रोजी १५.०० वा. सु. आपल्या शेतात होते. यावेळी त्यांचा मुलगा- सोनबा, नातु- उध्दव व यादव यांसह गावातील- खंडु ढोबळे आणि मंगेश व महेश देवकर या ६ जणांनी बेकायदेशीर जमाव जमवून शेतीसंबंधीत वादावरुन कोंडीबा यासह सुशीला व मालनबाई यांना शिवीगाळ करुन काठी, लोखंडी गजाने मारहाण करुन जखमी केले. अशा मजकुराच्या कोंडीबा देवकर यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या निवेदनावरुन भा.दं.सं. कलम- ३२६, १४३, १४७, १४८, १४९, ३२३, ५०४, ५०६ अन्वये गुन्हा दि. १५.०९.२०२० रोजी नोंदवला आहे.

---

**जनसंपर्क विभाग, उस्मानाबाद पोलीस.**